परभणी जिल्ह्यातील पाथरी, मानवत व परभणी तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग, राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**सार्वजनिक बांधकाम विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः रवियो-२०२५/प्र.क्र.१८/नियोजन-२**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक -११ सप्टेंबर, २०२५

**पहावे** :- १) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचे पत्र जा.क्र. मु.अ. नां/प्रआ-१३२८, दिनांक १६/०५/२०२५.

**प्रस्तावना :-**

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांनी संदर्भाधिन पत्रान्वये परभणी जिल्ह्यातील, पाथरी, मानवत व परभणी तालुक्यातील प्रमुख जिल्हा मार्ग, राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करणेबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे.

सदर रस्त्यांवरील गावांची संख्या, लोकसंख्या, रस्त्यांचा होणारा वापर व मागणी विचारात घेता, सदर रस्ते राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय** :-

मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड यांचा प्रस्ताव विचारात घेऊन परभणी जिल्ह्यातील पाथरी, मानवत व परभणी तालुक्यातील खालील प्रमुख जिल्हा मार्ग, राज्यमार्ग म्हणून दर्जोन्नत करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | प्रस्तावित रस्त्याचे नांव | सामाविष्ठ रस्त्याचा क्रमांक, साखळी क्रमांक व लांबी | दर्जोन्नत करावयाची एकूण लांबी (कि.मी.) | दर्जोन्नती नंतरचा क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १. | राममा-५४८ सी पासून गंगासावंगी नाथरा बानेगाव मरडगाव प्रजिमा-२६ रामा-६१ हदगाव नखाते रेणामुळे सिमुरगव्हाण राममा-६१ सावळी-पाळोदी-मांडाखळी - प्रजिमा-ब्राम्हणगाव प्रजिमा-२५, राममा ७५२ के ते अनुसया टॉकिज रामा ४३४ ला मिळणारा रस्ता. (ता. पाथरी, मानवत व परभणी) | प्रमुख जिल्हा मार्ग- २६ सा.क्र. ०/०० ते १२/९०० १२.९०० कि.मी. | ६५.६०० कि.मी. | **राज्यमार्ग क्रमांक-४९७** |
| | | प्रमुख जिल्हा मार्ग-२५ सा.क्र. ०/०० ते ५२/७०० ५२.७०० कि.मी. | | |
| | | रामा-२२१ मधील १.८ कि.मी., प्रजिमा-२२ मधील २.५ कि.मी., रा.म.मा.६१ मधील १.० कि.मी. व रा.म.मा.- ७५२ के मधील-३.५ | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | कि.मी. अशी एकूण ८.८ कि.मी. ओव्हरलॅप लांबी<br>एकूण लांबी ६५.६०० कि.मी. | | |
| २. | राममा-७५२ के टाकळी कुंभकर्ण आर्वी कुंभारी कास्टगाव प्रजिमा-४३ पिंपळगाव सय्यदमिय्या पेडगाव राममा-६१ मांडाखळी उमरी जवळा रामा-२३५ जवळ मिळणारा रस्ता. (ता. मानवत व परभणी) | प्रमुख जिल्हा मार्ग -४३ सा.क्र. ०/०० ते १५/०० १५.०० कि.मी.<br>प्रमुख जिल्हा मार्ग -३१ सा.क्र. १०/०० ते ४६/२८० ३६.२८० कि.मी.<br>रा.म.मा.६१मधील ०.२ कि.मी. ओव्हरलॅप लांबी.<br>एकूण लांबी ५१.२८० कि.मी. | ५१.२८० कि.मी. | **राज्यमार्ग क्रमांक-४९८** |
| ३. | राममा-६१ ताडबोरगाव देऊळगाव आवचार सावरगाव पाळोदी पिंपळा रामपुरी बु. हाटकरवाडी साळापुरी रुमणाफाटा रामा ७५२ के ला मिळणारा रस्ता. (ता. मानवत व परभणभ्) | प्रमुख जिल्हा मार्ग -२२ सा.क्र. ०/०० ते ४२/७०० ४२.७०० कि.मी<br>एकूण लांबी ४२.७०० कि.मी. | ४२.७०० कि.मी. | **राज्यमार्ग क्रमांक-४९९** |
| | **एकूण** | | **१५९.५८० कि.मी** | |

परिणामी रस्ते विकास योजना २००१-२०२१ मधील राज्यमार्ग रस्त्यांच्या एकूण लांबीत **१५९.५८० कि.मी.** ने वाढ होवून राज्यमार्गाची एकूण लांबी (३४५७६.५५० + **१५९.५८०)** म्हणजेच **३४७३६.१३० कि.मी.** इतकी होईल. व प्रमुख जिल्हा मार्ग रस्त्यांच्या एकूण लांबीत १५९.५८० कि.मी. घट होवून प्रमुख जिल्हा मार्गाची एकूण लांबी (१३३४.२८० - १५९.५८०) म्हणजेच **११७४.७०० कि.मी.** इतकी होईल.

सदर दर्जोन्नती खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) दर्जोन्नत लांबीमध्ये कोणतेही नवीन काम करण्यापूर्वी, संपूर्ण लांबीची आवश्यक ती रुंदी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नावे असल्याची खातरजमा संबंधीत मुख्य अभियंता, यांनी व्यक्तिश: करावी व तसे सर्व कागदपत्रांसह अभिलेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात यावे.

(२) भविष्यात भूसंपादनाची कोणतीही तक्रार, न्यायालयीन प्रकरण उद्भवल्यास, त्यास संबंधीत मुख्य अभियंता यांना जबाबदार धरण्यात येईल.

(३) उपरोक्त अटींची पूर्तता केल्याशिवाय कोणतीही कार्यवाही करण्यात येऊ नये.

हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या (www.maharashtra.gov.in) या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२५०९१११५३०५२४६१८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by AJIT DATTATRAYA KATKAR
Date: 2025.09.11 15:37:04 +05'30'

**( अजित काटकर )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर.

२) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नांदेड. (यांनी सदर शासन निर्णयानुसार रस्ते विकास योजना २००१-२०२१ च्या रस्ते सूचीमध्ये नोंद घ्यावी व नकाशामध्ये बदल करुन जिल्ह्याच्या संकेतस्थळी प्रसिध्द करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा)

३) अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, नांदेड. (यांनी सदर शासन निर्णयानुसार रस्ते विकास योजना २००१-२०२१ च्या रस्ते सूचीमध्ये नोंद घ्यावी व नकाशामध्ये बदल करुन जिल्ह्याच्या संकेतस्थळी प्रसिध्द करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास सादर करावा.)

**प्रत :-**

१) जिल्हाधिकारी, परभणी.

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,परभणी.

३) संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.

४) रेखाचित्र शाखा, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय.

५) रस्ते विकास योजना २००१-२०२१ ची नस्ती.

६) निवडनस्ती.